**UNIVERSITY GRANTS COMMISSION**
**BHADUR SHAH SAFAR MARG**
**NEW DELHI - 110 002.**

Annexure : VIII

**PROFORMA FOR SUBMISSION OF INFORMATION AT THE TIME OF SENDING THE FINAL REPORT OF THE WORK DONE ON THE PROJECT**

1. Name and address of the principal investigator : SHELAKE NILESH KEDARI
   Dr. Ghali college, Gadhinglaj.

2. Name and address of the institution : Dr. Ghali college, Gadhinglaj.
   Dist- Kolhapur.416502 ( Maharashtra )

3. UGC approval no and date : File, 23-786/09(WRO)
4. Date of implementation : 20th Aug.2009
5. Tenure of the project : 20/08/2009 to 19/08/2011
6. Total grant allocated : 65,000/-
7. Total grant received : 62,500/-
8. Final expenditure : 70,121/-
9. Title of the project : Folk Literature in Gadhinglaj Taluka : A critical study.
10. Objective of the project :

१. गडहिंग्लज तालुक्यातील लोकसाहित्याचे संकलन करणे आणि या संदर्भाने तालुक्यातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक गोष्टींचा शोध घेणे.
२. प्रयोगरूप लोककलेचा अभ्यास करणे.
३. लोकसाहित्याच्या या संकलनाच्या आधारे येथील लोकजीवन समजून घेणे.
४. या लोकसाहित्याची वैशिष्ट्ये लक्षात घेणे.
५. लोककथा, दंतकथा, लोकगीते, प्रयोगरूपकला आणि अन्य अनुषंगिकबाबींचे ध्वनिचित्रमुद्रण करून छायाचित्रे काढून सांस्कृतिक ठेवा म्हणून ते जतन करणे, त्या सामग्रीचा स्वत:च्या अभ्यासाठी उपयोग करणे तसेच अन्य अभ्यासकांनाही ही सामग्री उपलब्ध करून देणे.

11. Whether objectives were achieved :

सदर लघुसंशोधनामध्ये खालील उद्दिष्टांचा अभ्यास केला आहे.

**गडहिंग्लज तालुक्यातील लोकसाहित्याचे संकलन करणे आणि या संदर्भाने तालुक्यातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक गोष्टींचा शोध घेणे.**

अभ्यासाच्या कालावधीत गडहिंग्लज तालुक्यातील जवळजवळ सर्व गावांना भेटी देऊन लोकसाहित्याचे संकलन केले. या संकलनातून हाती आलेल्या सामग्रीच्या अधारे विश्लेषण करून या लघुसंशोधन प्रकल्पाची सहा प्रकरणामध्ये विभागणी करण्यात आली. संकलन करत असताना या संकलनाबरोबरच विविध गावांतील सामाजिक जीवन समजून घेतले. विभिन्न समाजातील लोक, त्यांच्या प्रथापरंपरा, चालीरीती यांचा अभ्यास केला. याशिवाय विविध धर्माचे लोक आणि त्यांच्या परंपरा यांचाही शोध घेतला. या परिसरात अनेक जातीधर्माचे लोक असूनही येथील लोकमानसाने एकूण मानवता हाच धर्म महत्त्वाचा मानला आहे हे लक्षात येते.

**प्रयोगरूप लोककलेचा अभ्यास करणे.**

या परिसरातील लोकपरंपरेचा अभ्यास करत असताना प्रयोगरूप लोककला प्रकारांचे संकलन फारसे करता आले नाही. गोंधळ, वाघ्यामुरळीचे जागरण, कीर्तन, सोंगी भजन, भारूडे, तमाशा अशा अनेक प्रयोगरूप लोककला महाराष्ट्रात लोकप्रिय आहेत. पण हा भाग कर्नाटक सीमाप्रदेशाशी निगडीत असल्याने या परिसरात अलिकडच्या काळात तमाशा कुठेही आढळत नाही. त्याऐवजी कन्नड नाटके सादर केली जातात. येथे कन्नड नाटकांचा अभ्यास केलेला नाही. सोंगी भजन, भारूडे यांचे संकलन केलेले आहे पण ही भारूडे, सोंगी भजने संतांचीच सादर केली जात असल्यामुळे त्यांचाही समावेश केला नाही. गोंधळ आणि जागरण कुलाचार म्हणून साजरे केले जातात यांचे व्हीडीओ चित्रण केलेले आहे. अलिकडे हा गोंधळविधी करतानाही गोंधळाचा पूर्वरंग, उत्तररंग असे विभाग न करता पूर्वरंगातील केवळ पूजाविधी करून, एखादे गीत म्हणून हा विधी संपवला जात आहे. परिणामी याचा भाषिक अंगाने अभ्यास करता आला नाही. विधीपरंपरेचे अनेक ठिकाणचे व्हीडीओ चित्रिकरण केलेले आहे. ते इतर संशोधकांना उपयोगी पडू शकेल. मात्र या परिसराने जोखमाराची परंपरा अजूनही जपली आहे. त्याचे संकलन आणि सविस्तर विश्लेषण या लघुसंशोधन प्रकल्पात केलेले आहे.

**लोकसाहित्याच्या या संकलनाच्या आधारे येथील लोकजीवन समजून घेणे.**

लोकसाहित्याच्या संकलनातून आणि संशोधनातून येथील लोकजीवनाचे विविध पैलू समजून घेता आले. कर्नाटक सीमाप्रदेश असल्याने शेजार भाषेचा आणि संस्कृतीचा प्रभाव या लोकजीवनावर पडलेला आहे. कर्नाटकातील नाट्यपरंपरा या परिसरात जपली जाते, अजूनही ग्रामीण भागात यात्रेच्या वेळी कन्नड नाटके सादर केली जातात. लोकजीवनातील विधींचे प्रमाण

कमी झालेले असले तरी जे विधी आहेत ते निष्ठेने केले जातात. या परिसराने सर्व लोकदैवतांना आपले मानले आहे. त्यांची निष्ठेने पूजा केली आहे. जोखमाराची प्रथा आता महाराष्ट्रात फारशी कुठे आढळत नाही, पण या परिसराने ती अजूनही जपली आहे. महालक्ष्मी यात्रा या परिसरात मोठ्याने साजरी होते. या यात्रेच्या वेळी सर्व जातीधर्मांना स्थान दिले आहे. अनेक दुर्लक्षित असणाऱ्या जातींना या देवीच्या यात्रेत मानाचे स्थान दिलेले दिसते.

**या लोकसाहित्याची वैशिष्ट्ये लक्षात घेणे.**

लोकसाहित्यात लोककथा, लोकगीते, विधीनाट्ये, प्रयोगरूप कला यासर्वांचा समावेश होतो. या परिसरातील लोकसाहित्याचे संकलन करताना लोकगीतांची विपुलता जाणवली. ही सर्व लोकगीते स्त्रियांनी अजूनही जीवापाड जपली आहेत. या लोकगीतांमधून स्त्रियांनी आपली संस्कृती आणि परंपरा जपण्याचे काम केले आहे. विविध प्रसंग, नातेसंबंध, सणसमारंभ यावरील गीते संकलित केलेली आहेत मात्र पुरुषांची गाणी मिळाली नाहीत. म्हणी, उखाण्यांतून भाषावैभव, वाक्चातुर्य, प्रासादिक शैली ही गुणवैशिष्ट्ये आढळून आली. लोकसाहित्याचे संकलन करत असताना पद्यमय लोकसाहित्याची विपुलता जाणवली मात्र गद्यमय लोकसाहित्याचा आभाव प्रकर्षाने जाणवला. तालुक्यातील बहुसंख्य लोकांची कन्नड ही बोलीभाषा असल्यामुळे मराठी भाषेवर याचा परिणाम झालेली दिसतो. शेजारच्या भाषासंपर्काने लिंगविचार, विभक्तीविचार यात फरक झालेला आहे. संकलित केलेल्या सर्व लोकसाहित्याचा सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि भाषिक अंगाने अभ्यास करता आला.

**लोककथा, दंतकथा, लोकगीते, प्रयोगरूपकला आणि अन्य अनुषंगिकबाबींचे ध्वनिचित्रमुद्रण करून छायाचित्रे काढून सांस्कृतिक ठेवा म्हणून ते जतन करणे, त्या सामग्रीचा स्वतःच्या अभ्यासाठी उपयोग करणे तसेच अन्य अभ्यासकांनाही ही सामग्री उपलब्ध करून देणे.**

गडहिंग्लज तालुक्यातील लोकसाहित्याचा अभ्यास करताना अनेक विधींचे, प्रथापरंपरांचे, लोकगीतांचे, यात्रा प्रसंगांचे व्हीडीओ चित्रण केलेले आहे. याचबरोबर विविध मंदिरे, त्यांची शैली, लोकदैवते, विविध प्रसंग यांची अनेक छायाचित्रे घेतलेली आहेत. अलिकडे जागतिकीकरणाच्या युगात लोकसाहित्याचा प्रवाह खंडीत होताना दिसतो आहे. अलिकडची पिढी या लोकसाहित्याकडे फारसे गांभीर्याने पाहताना दिसत नाही. हा मौखिक ठेवा पुढच्या पिढीपर्यंत संक्रमित करायचा असेल आणि आणखी काही वेगवेगळ्या अंगांनी याचा शोध घ्यायचा असेल तर ही छायाचित्रे आणि ध्वनिचित्रमुद्रण उपयोगी ठरणार आहे.

12. Achievement from the project :

या लघुसंशोधन प्रकल्पाद्वारे खालील बाबी साध्य होण्यास मदत झाली.

१. या परिसरातील लोकदैवतांच्या अभ्यासामुळे लोकमानस समजून घेता आले.
२. रीतीरिवाज, रूढी, प्रथा परंपरा यांचे आकलन होण्यास मदत झाली.
३. मौखिक वाङ्मयाचे संकलन करता आले.
४. लोकगीतांमधून स्त्रीमनाचा वेध घेता आला.
५. समाजजीवनाचे अनेकविध पैलू अभ्यासता आले.
६. सर्वप्रकारच्या संकलनातून या परिसराची संस्कृती समजून घेता आली.
७. मौखिक व अलिखित असणारी ही सामग्री संशोधन प्रकल्पाच्या माध्यमातून लिखित स्वरूपात आली.
८. काही नष्ट होऊ पाहणाऱ्या प्रथा परंपरांचे अभ्यासाच्या दृष्टीने संकलन करता आले, चित्रीकरण करता आले.
९. पुढच्या अभ्यासकांना हा ठेवा उपलब्ध करून देता आला.
१०. सर्व संकलित साहित्यातून भाषाविशेष शोधता आले, इथल्या बोलीची वैशिष्ट्ये जाणून घेता आली.

13. Summary of the findings :

गेल्या दोन वर्षात गडहिंग्लज तालुक्यातील लोकसाहित्याचा अभ्यास केल्यानंतर काही विशेष गोष्टी लक्षात आल्या. लोकसाहित्य हे प्राचीन काळापासून मानवाची संस्कृती जतन करत आलेले आहे. लोकसाहित्य हा मानवाच्या मनाचा आदिम आविष्कार आहे. त्यामुळे या परिसरातील लोकसाहित्याचा अभ्यास करत असताना या सर्व नव्या जुन्यांचा शोध घेतला आहे. या परिसराची सामाजिक, सांस्कृतिक पार्श्वभूमी नेमकी काय आहे याचा शोध अनेक माध्यमांतून घेऊन इथे असणारे वेगवेगळे समाज, त्यांच्या चालीरीती, प्रथा परंपरा यामधून इथली संस्कृती शोधली. हा परिसर शक्तीची उपासना करणारा आहे याच्या अनेक खुणा इथे सापडल्या.

गडहिंग्लज परिसरातील बरीच ग्रामनामे ही कानडी–द्रविडी प्रभावातील आहेत. बऱ्याच गावांची नावे पूर, वाड, वाडी, गे, वाट, हाळ, व्हसा ऊर, कट्टी, हट्टी अशा शब्दांनी बनलेली आहेत. लोकसाहित्याचे संकलन करत असताना पद्यमय लोकसाहित्याची विपुलता जाणवली मात्र गद्यमय लोकसाहित्याचा आभाव प्रकर्षाने जाणवला. केवळ काही आख्यायिका, दंतकथा यांचेच संकलन करण्यात यश आले. देवदेवता, गावासंबंधीच्या आणि काही व्यक्तीसंबंधीच्या आख्यायिकांचे संकलन आणि विश्लेषण केलेले आहे. देवदेवतांच्या बऱ्याच आख्यायिकांमध्ये साम्य आढळते. मौखिक परंपरा टिकविण्याचे काम स्त्रियांनीच अधिक प्रमाणात केलेले आहे हेही लक्षात येते.

वीरशैव समाजात मठ हे महत्त्वाचे श्रद्धास्थान आहे. वीरशैव धर्म, समाज आणि त्यांचे मठ यांचे परस्पर निकटचे संबंध आहेत. या परिसरातही गडहिंग्लज, नूल, समानगडाच्या पायथ्याला, हसूरचंपू, दुंडगे, मुत्नाळ, मुगळी अशा अनेक ठिकाणी जडियसिद्धेश्वर, सुरगीश्वर, रामनाथगिरी, भीमशाप्पा, सुवर्णमाताजी, ओंकारेश्वर, दुरदुडेश्वरमठ हे मठ आहेत. या मठांमधून आजही वीरशैवपंथाने सामाजिक आणि धार्मिक अधिष्ठानातून स्वत:ची एक परंपरा निर्माण केली आहे.

या परिसरातील लोकदैवतांचा अभ्यास केल्यानंतर काही बाबतीत खूप वेगळेपण या परिसराने जपले आहे हेही लक्षात येते. बलुचीस्थानात उगम असणारी हिंगलजामाता, सर्व परिसराचे क्षात्रदैवत असणारा काळभैरव, देवतांमध्ये गुड्डाई, जोमकाई, रासाई अशा मानल्या जाणाऱ्या तीन भगिणी, त्यांची निष्ठेने केली जाणारी उपासना हे सर्व या परिसरात पहायला मिळते. या परिसरात वीरशैव लिंगायत समाज मोठ्या प्रमाणात असल्यामुळे शिवलिंगांची संख्या भरपूर आहे. सोमलिंग, अमृतेश्वर, लखमेश्वर, कल्लेश्वर अशी अनेक लोकदैवतं आढळतात. या परिसरातील बऱ्याच शिवमंदिरांच्या बाहेर जो नंदी आहे त्याला बोलीभाषेत *बसवाण्णच* म्हटले जाते. बसवेश्वरांना नंदीचा अवतार मानल्यामुळे ही परंपरा रूढ झाल्याचे दिसते. हा परिसर कोकणाशी केवळ भौगोलिकतेच्या अंगाने जोडलेला आहे असे नाही, तर अनेक सामाजिक, सांस्कृतिक चालीरीतींच्या माध्यमातूनही या परिसराने कोकणाशी आपली नाळ जोडली आहे. लोकदैवतांमध्येही परशुराम, रवळनाथ, चाळोबा, थळोबा अशी कोकणातील दैवतं या परिसराने शेकडो वर्षापासून आपली मानली आहेत. त्यांची भक्तीभावाने पूजा केली आहे. ख्रिश्चन, जैन, मुस्लिम यांच्या दैवतांचाही या परिसराने मन:पूर्वक  स्वीकार केला आहे. निखळ आणि निर्मळ धार्मिकतेचे एक वेगळे वैशिष्ट्य घेऊन या परिसराने आपली परंपरा जोपासली आहे.

जैन धर्माचे तीर्थंकर भगवान चंद्रप्रभू यांचे मंदिर उत्तूर गावात आहे. जैन समाजाची सहा—सात घरे असली तरी संपूर्ण गावाने ही परंपरा आपली मानली आहे. जेव्हा मंदिराचा जीर्णोद्धार करण्याची कल्पना पुढे आली. तेव्हा सर्व हिंदूधर्मीय बांधवांनी लाखो रुपयांची मदत करून देखणे मंदिर साकारले. गजरगावच्या लखमेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार करताना पाया खुदाईच्या वेळी पार्श्वनाथांची मूर्ती सापडली. कै० नाना चव्हाण या व्यक्तीने यासाठी स्वतंत्र मंदिर बांधून मूर्तीची प्रतिष्ठापना केली. गुर्जरगावचे गजरगाव आणि जैनापूरचे ऐनापूर असे झालेले अपभ्रंश हे जैन परंपरेशी नाते सांगणारेच आहेत.

इब्राहिमपूर हे आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण गाव. गावाचे नाव इब्राहिमपूर असले तरी गावात एकही मुस्लिम कुटुंब नाही. गावात सुमारे दोन हजार वर्षापूर्वीची प्राचीन जैन मंदिरे आहेत. जैनांची प्राचीन मंदिरे असली तरी गावात एकही जैन कुटुंब नाही. मुस्लिम किंवा जैन लोक नसतानाही स्थानिक हिंदू

धर्माच्या लोकांनी गावाच्या नावाचा मन:पूर्वक स्वीकार केलेला आहे आणि जैन मंदिरांचीही उत्तम देखभाल केली आहे.

लोकसंस्कृतीत कोणत्याही धर्माचा माणूस कोणत्याही देवतेची उपासना मनोभावे करीत असतो. कोणत्याही देवाला नवस–सायास करतो. त्या देवतेच्या नवस फेडण्याच्या पद्धतीनुसार नवस फेडत असतो. यात जातीपातीचा, धर्माचा मुद्दा गौण असतो. कवळीकट्टी या गावात एकही मुस्लिम कुटुंब नाही, तरीही त्या गावात पीराचा मोठा दर्गा आहे. मोहरमचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. अत्याळ या गावी ग्रामदैवत असलेल्या श्री महालक्ष्मीच्या मंदिरातच ताबूत आणि पंजाची प्रतिष्ठापना केली जाते. मोहरम हा सण मुस्लिमांचा आहे की हिंदूंचा, यापेक्षा त्यामागच्या भावना महत्त्वाच्या आहेत. त्यासाठी झालेला संघर्ष समाजहितासाठी होता, ही धारणाच समाजाची पहिली बाजू आहे. ती अधिक माणूसकीपर्यंत नेणारी आहे. जग काळवंडत जात असताना ही भावना अधिक महत्त्वाची ठरते. माणुसकीचा हा जागर करण्याचे काम आणि धर्म माणसे जोडण्यासाठी असतो तोडण्यासाठी नव्हे हे वर्षानुवर्षे आपल्या कृतीतून साकार करणारे लोक हाच लोकसाहित्याच्या अभ्यासाचा विषय असतो. हा लोकमानसाचा अभ्यास पुन्हा एकदा करून नव्या संशोधकांनी तो प्रकाशात आणला तर आज धर्म हा सूडाचा द्वेशाचा विषय होणार नाही. धर्माच्या नावाने तापणारे प्रदेश आणि होरपळणारी माणुसकी थांबवायची असेल तर लोकपरंपरेतील अशी लेणी सर्वत्रच जपणे गरजेचे आहे हे लक्षात येते.

14. Contribution to the society :

लोकसाहित्य हे लोकांचे पर्यायाने त्या देशाचे महाधन आहे, अमूल्य खजिना आहे. लोकसाहित्यात लोकजीवनाची, संस्कृतीची विविध रूपे, चित्रे रेखाटलेली असतात. त्यामुळे गडहिंग्लज तालुक्यातील लोकसाहित्याचा अभ्यास केल्यानंतर या परिसराची संस्कृती, इथल्या परंपरा समजून घेता आल्या. लोकसाहित्यात लोकांचा आत्मा सामावलेला असल्यामुळे लोकसाहित्यील जिवंतपणा आणि लोकसाहित्य आणि लोकजीवन यांचा जवळचा संबंध यांचा अभ्यास करता आला, आणि हे सर्व नव्या पिढीपुढे आणता आले.

संस्कृतीच्या खुणा लोकसाहित्यातून दिसतात. जवळ जवळ सर्व लोकांची, त्यांच्या जगण्याची अभिव्यक्ती लोकसाहित्यातून, लोकमानसातून झालेली दिसते. लोकसाहित्यातून लोकाभिरूचीचे दर्शन घडते. म्हणून लोकसाहित्याचा सूक्ष्मपणे अभ्यास करून ही सामग्री अन्य अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देता आली.

लोकसाहित्याचा अभ्यास करताना ते साहित्य ज्या समाजाचे आहे त्या समाजातील विविध चालीरीतींचा, आचारविचार, पद्धती, प्रथापरंपरांचा विचार करूनच अभ्यास करावा लागतो, कारण या सगळ्यांचे प्रतिबिंब लोकसाहित्यात पडलेले असते. यातून लोकजीवन, लोकसंस्कृती

समजते. एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत लोकसाहित्यात देवाणघेवाण होत असताना त्यातील नव्या बदलांची जाणीव ठेवूनही असे म्हणता येईल की मानवाच्या आद्य संस्कृतीचे अवशेष आपल्याला लोकसाहित्यातच आढळतात. या दृष्टीनेही लोकसाहित्याचा केलेला हा अभ्यास समाजासाठी उपयुक्त ठरेल असा मला विश्वास वाटतो.

लोकसाहित्यात लोकप्रतिभेचा आविष्कार असतो. लोकसाहित्य हे लोकमानसाचा आवष्किार असते. त्यातून समाजमानस अभिव्यक्त होते. लोकसाहित्यातून समाजाच्या अतृप्त इच्छा आकांक्षाचा आवष्किार घडतो, त्याचप्रमाणे त्यांची सुख:दुखेही प्रकट होतात. लोकसाहित्याचे संकलन करताना त्याचा सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ लक्षात घेऊन संकलन केले आहे. त्यामुळे हे संकलन आणि संशोधन समाजातील विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, सांस्कृतिक मंडळे, वाचक संशोधक, त्या त्या समाजातील अभ्यासक या सर्वांसाठी उपयुक्त ठरेल अशी आशा वाटते.

15. Whether any Ph.D. enrolled /produced out of the project : No

16. No. of publications out of the project :

१. **गडहिंग्लज परिसरातील आख्यायिका** ह्या शोधनिबंधाचे कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, कोल्हार जि०अहमदनगर येथील ***राष्ट्रीय चर्चासत्रात*** वाचन आणि त्यांनी काढलेल्या स्मरणिकेत प्रकाशित.( २७,२८,२९ जानेवारी, २०११ )

२. **धर्म आणि जातीभेदापलीकडची लोकदैवतं** हा शोधनिबंध ***आमची श्रीवाणी*** या नियतकालिकात प्रसिद्ध. ( फेब्रुवारी–मे, २०११ ) ISSN 0971- 6955

**PRINCIPAL INVESTIGATOR** **PRINCIPAL**